**संस्कार मंदिर संचालित**

# कला व वाणिज्य महाविद्यालय,

**वारजे माळवाडी, पुणे ५८.**

## नियमित कार्यक्रम अहवाल

**2019-2020**

### दि. 10 जून ते 31जुलै 2019 स्वच्छ भारत समर इंटरंशिप

या अभिनव उपक्रमाअंतर्गत महाविद्यालयातील 10 जून ते 31जुलै 2019 रोजी स्वच्छतेच्या संदर्भातील उद्बोधन कौशल्य विकसित करणे, युवकांना स्वच्छता क्रांतीपर्वात भरीव योगदान देण्यासाठी सहभाग सहभागी करणे ग्रामीण भागातील सामूहिक युवकांना केंद्रित करणे इत्यादी वैशिष्ट्य लक्षात घेऊन ऑनलाईन पद्धतीने 10 विद्यार्थ्यांची नाव नोंदणी करण्यात आली.

### दि. २१ जुलै २०१९ " आंतरराष्ट्रीय योगा दिवस

मंगळवार दि. २१/०७/२०११ रोजी सकाळी ०८.३० ते १०.३० यावेळेत आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. या निमित्ताने महाविद्यालयातील ग्रंथपाल यांनी " दैनंदिन जिवनात योगाचे महत्व व निरोगी आरोग्य या विषयावर व्याख्यान देवून योगाची प्रात्यक्षिके करून दाखविली व विद्यार्थ्यांकडून देखील प्रात्यक्षिके करून घेण्यात आली.

**दि.01 ऑगस्ट 2019 युवा माहिती दूत या उपक्रमाअंतर्गत**

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण होण्यास व त्यांची नेतृत्वगुण विकसित करण्याकरता माहिती दूत महाविद्यालयांमध्ये तयार करण्यात आले.

**दि. 09 ऑगस्ट 2020 स्वच्छ व स्वस्त भारत अभियान या एक दिवसीय श्रमशिबिराचे महाविद्यालयांमध्ये आयोजन**

राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने दि. 09 ऑगस्ट २०१९ वन महोत्सव साजरा करण्यात आला. झाडे लावा, झाडे जगवा व एक विद्यार्थी एक झाड या घोष वाक्यांच्या आधारे वारजे परिसरातील वारजे उद्यानात महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक व परीसरातील सामाजिक कार्यकर्ते व मा. प्राचार्य यांच्या हस्ते वृक्ष लागवाड करण्यात आली. या उपक्रमासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये सात स्वयंसेवक पाठविण्यात आले.

**१ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट २०१९ स्वच्छ व स्वस्थ भारत अभियान**

राष्ट्रीय सेवा योजने अतंर्गत दि. १ ते १५ ऑगस्ट दरम्यान स्वच्छ व स्वस्थ भारत अभियान महाविद्यालयात राबविण्यात आले. सदर स्वच्छ पंधरवड्यामध्ये सा.फु.पुणे विद्यापीठाने निर्देशित केल्या प्रमाणे विविध उपक्रम राबविण्यात आले.

1. दि.3 ऑगस्ट २०१९ रोजी महाविद्यालयातील रा.से.योजनेतील विद्यार्थ्यांनी सर्वात प्रथम स्वच्छतेची शपथ घेतली.
2. दि.5 ते 6 ऑगस्ट २०१९ रोजी दररोज ४ तास याप्रमाणे वारजे रामनगर व परीसर येथे स्वच्छता अभियान राबविण्यात आले. तसेच सदर परीसरात घरोघरी जाऊन स्वच्छतेविषयी जनजागृती करण्यात आली.

3. दि. 10 ते 11 ऑगस्ट दरम्यान सकाळी ११.०० ते दुपारी २.०० या कालावधीत महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ करण्यात आला.

4. दि.12 ते 13 ऑगस्ट २०१९ रोजी वारजे परीसरातील पुणे महानगर पालिकेच्या आरोग्य विभागातील परीसर स्वच्छ करण्यात आला. तसेच त्यातून निरोगी आरोग्याचा संदेश देण्यात आला.

5. दि. 14 ऑगस्ट २०१९ रोजी दररोज ४ तास याप्रमाणे वारजे रामनगर व परीसर येथे स्वच्छता अभियान राबविण्यात आले. तसेच सदर परीसरात घरोघरी जाऊन स्वच्छतेविषयी जनजागृती करण्यात आली.

**दि. १५ ऑगस्ट २०१९ " स्वातंत्र्यता दिन "**

दि. १५ ऑगस्ट २०१९ रोजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत स्वातंत्र्यता दिन साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमास संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. दिलीप बराटे यांनी स्वातंत्र्यता दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना संबोधित केले.

**दि. 29 ऑगस्ट 2019 रोजी सुदृढ भारत अभियान** राबविण्यात आले. या उपक्रमांतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना आरोग्य विषयक माहिती, सुदृढ व निरोगी राहण्यासाठी नियमित व्यायाम व योगसाधना आणि सकस आहार यावर महाविद्यालयातील क्रीडा प्रमुख प्रा. अभिजीत परसे सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**दि. १४ सप्टेंबर २०१९ " हरीत मित्र परीवार "**

दि. १४ सप्टेंबर २०१९ रोजी हरीत मित्र परीवार यांच्या मार्फत डॉ. महेद्रं घागरे सरांनी रोपाची निर्मिती लागवड, विदेशी वृक्षांचे बियाणे आणि चंदनाच्या बियाण्यांच्या उगवण क्षमते संदर्भात रा.से. योजनेच्या स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले.

**दि. १५ सप्टेंबर २०१९ 66 महाश्रमदानाचे आयोजन "**

दि. १५ सप्टेंबर २०११ रोजी महाविद्यालयात रा.से.यो व विद्यार्थी विकास मंडळाच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील सर्व परीसर स्वच्छ करून श्रमदान करण्यात आले.

**दि. २४ सप्टेंबर २०१९ राष्ट्रीय सेवा योजना वर्धापन दिन "**

दि. २४ सप्टेंबर २०१९ रोजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना वर्धापन दिन साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमास संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. दिलीपभाऊ बराटे यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उदघाटन करण्यात आले. तसेच या प्रसंगी गौरवार्थ विद्यार्थ्यामध्ये देशप्रेम व राष्ट्रनिष्ठा निर्माण व्हावी. डॉ. परमेश्वर गडकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमास मा. प्राचार्य डॉ. दिलीप भोईटे व सर्व प्राध्यापक उपस्थित होते.

**दि. २४ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०१९ 66 महात्मा गांधी जयंती "**

दि. २४ सप्टेंबर २०१९ ते २ ऑक्टोबर २०११ रोजी महात्मा गांधी पंधरवडा साजरा करण्यात आला. महात्मा गांधीजींच्या 150 व्या जयंतीनिमित्त नही तालीम या विषयांतर्गत एका आठवड्यामध्ये महाविद्यालयामध्ये गांधीजींचे तत्व गांधीजींची शिकवण या विषयावर व्याख्यान आणि चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. या चर्चासत्रामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर दिलीप भोईटे यांनी राष्ट्रीय स्वयंसेवकांना समग्र गांधी यांनी आपल्या आपले सर्व आयुष्य हे भारत मातेसाठी समर्पीत करणारे गांधी हे समर्पण त्यांनी ज्या तत्त्वातून प्राप्त झाले. ते तत्त्व त्यांनी विद्यार्थ्यांना उदाहरणाच्या माध्यमातून व्यक्त केले.

**दि. 2 ऑक्टोंबर 2019 स्वच्छ, सुंदर व प्लास्टिकमुक्त नदी** या अभियानांतर्गत आपल्या महाविद्यालयातील 25 विद्यार्थ्यांनी मुळा-मुठा या नदी स्वच्छ करण्याकरिता सक्रिय सहभाग नोंदवून 20 किलो प्लास्टिक गोळा करण्यात आले. महाविद्यालय परिसरात प्लास्टिक मुक्त रॅलीचे आयोजन करण्यात आले. यामध्ये विद्याथ्र्यांनी प्लास्टिकच्या वस्तू, बाटल्या, कॅरीबॅग व प्लास्टीक न वापरण्या संदर्भात परीसरातील नागरीकांची जनजागृती केली. दि. १९जानेवारी २०२० रोजी सदर सप्ताहाची सांगता प्राचार्य डॉ. दिलीप भोईटे सरांच्या उपस्थितीत करण्यात आली.

**दि. १५ ऑक्टोबर २०१९ " वाचन प्रेरणा दिन "**

दि. १५ ऑक्टोबर २०१९ रोजी महाविद्यालयात डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम यांचा जम्न दिवस "वाचन प्रेरणा दिवस " म्हणून साजरा करण्यात आला. यावेळी

महाविद्यालयातील ११० विद्यार्थ्यांनी ग्रंथालयाच्या वाचन कक्षात आठ तास पुस्तक, ग्रंथ, कविता संग्रह आणि कादंबरीचे वाचन करण्यात आले. हा दिवस विद्यार्थ्यांसाठी प्रेरणा दिवस ठरला. त्यातूनच वाचनाची गोडी व चिंतनाची सवय विद्यार्थ्यांमध्ये वाढीस लागली.

**दि. ३१ ऑक्टोबर २०१९ राष्ट्रीय एकता दिवस "**

दि. ३० ऑक्टोबर २०११ रोजी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जन्म दिवसा निमित्त " राष्ट्रीय एकता दिवस" महाविद्यालयात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना डॉ. कविता मुनेश्वर यांनी भारतीय ऐक्य या विषयावर मार्गदर्शन केले. तसेच राष्ट्रीय एकात्मतेची शपथ देण्यात आली. त्याच बरोबर डॉ. दिपक शिंदे यांचा लघु माहितीपट दाखविण्यात आला.

**दि. 26 नोव्हेंबर 2019 रोजी संविधान दिन** म्हणून साजरा करण्यात आला. या दिनानिमित्त महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. स्वप्नील गायकवाड यांनी संविधानातील मूलभूत कर्तव्य व्यक्तीला मिळालेले अधिकार भारतीय राज्यघटना सामाजिक व आर्थिक समानता राष्ट्रीय सुसंवाद आणि त्यातील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान या बाबत स्वरूपाचे व्याख्यानातून आपले मत व्यक्त केले. तसेच अध्यक्ष भाषण महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी सविधान क भारतीयांना जगण्याचे अधिकार प्राप्त करून देणारे सर्वात महत्त्वाचे आणि मानवाला एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवणारे उत्तम स्वरूपाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि लिखाण केलेले आहे. या कार्यक्रमाचे आभार राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. संजय गिरी यांनी मानले.

**दि. ०५ डिसेंबर २०१९ 66 जागतिक मानव अधिकार दिन "**

बुधवार दि. ०५ डिसेंबर २०११ रोजी जागतिक मानवी अधिकार दिन साजरा करताना प्रा. रायसिंग पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आपल्या मार्गदर्शनातून प्रत्येकाला स्वातंत्र्यपणे जगण्याचा अधिकार असून इतरांच्या स्वातंत्र्यावर गदा येणार नाही असे विचार त्यांनी मांडले.

**दि. 11 ते 17 जानेवारी 2020 या कालावधीमध्ये 31 वा वा रस्ता सुरक्षा सप्ताह दिन** साजरा करण्यात आला. यामध्ये स्वयंसेवकांनी रस्ते वाहतुकीत सुरक्षितता, त्याच्यातील संवेदनशीलता, जनजागृती आणि रॅलीच्या माध्यमातून समाज प्रबोधन करण्यात आले.

## दि. १२ जानेवारी २०२० युवा सप्ताह

दि. १२ जानेवारी २०२० रोजी स्वामी विवेकानंद जयंती राजमाता जिजाऊ जयंती व युवा दिन साजरा करताना काव्यवाचनाचा कार्यक्रम संपन्न झाला. दि. १३ जानेवारी २०२० रोजी प्रा. डॉ. स्वप्नील गायकवाड यांनी "स्वामी विवेकानंदाचे विचार आजचा युवक " या विषयावर व्याख्यान दिले. तसेच दि. १५ जानेवारी २०२० रोजी महाविद्यालयात स्वच्छ भारत अभियान हा उपक्रम राबविण्यात आला. सदर स्वच्छतेमध्ये सर्व वर्ग, ग्रंथालय व आजुबाजूचा परीसर स्वच्छ करण्यात आला.

**दि. 24 जानेवारी 2020 रोजी राष्ट्रीय बालिका दिन** म्हणून साजरा करण्यात आला यामध्ये महिला सबलीकरण बेटी बचाव बेटी पढाव महिला क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या महिलांचा कार्यक्रम त्यांचा सत्कार आणि महिलांना दिलेले कायद्यातील संरक्षण याविषयी जनजागृती करण्यात आली.

## दि. २६ जानेवारी २०२० 66 प्रजासत्ताक दिन "

दि. २६ जानेवारी २०२० रोजी महाविद्यालयात प्रजासत्ताक दिन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. दिलीपभाऊ चराटे यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिलीप भोईटे सर प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्या समवेत साजरा केला,

## दि. ३० जानेवारी २०२० " हुतात्मा दिन "

दि. ३० जानेवारी २०२० रोजी हुतात्मा दिन महाविद्यालयात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपली मते व्यक्त करून हुतात्म्यांना श्रदधाजली अर्पण करण्यात आली.

## दि. 27 फेब्रुवारी 2020 रोजी मराठी राज्यभाषा दिवस

वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस म्हणून मराठी राज्यभाषा दिवस म्हणून साजरा करण्यात आला. या दिवशी महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांचे कवी संमेलन आयोजित करण्यात आले होते यामध्ये अनेक स्वयंसेवकांनी उस्फुर्त कविता सादर केल्या.

**दि. ०८ मार्च २०२० " आंतरराष्ट्रीय महिला दिन**

दि. ०८ मार्च २०२० रोजी आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करण्यात आला. आधुनिक काळात महिलाशक्ती देशाचे प्रेरणास्थान असून महिला सर्वच क्षेत्रात पुरुषांबरोबर समान पातळीवर काम करतात. त्याच बरोबर विद्यार्थ्यांमध्ये महिलांचा सन्मान या विषयावर चर्चा करण्यात आली.

राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी

**डॉ. संजय गिरी**